प्रेसनोट दि.०७.०५.२०१९

<u>शिर्षक</u> :- **सांगली, मिरज आणि कपवाड शहर महानगरपालिका कार्यालय, मिरज, सामान्य प्रशासन विभागातील लिपीक श्री. अजित धनपाल राजमाने यांना १०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले, सांगली लाचलुचपत प्रतिर्बेधक विभागाची कारवाई**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | मिरज शहर पोलीस स्टेशन, गुरनं २२८/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| अरोपीचे नाव व कार्यालय | श्री. अजित धनपाल राजमाने, कनिष्ठ लिपिक, सामान्य प्रशासन विभाग, सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली कार्यालय मिरज रा. अपरज अपार्टमेंटजवळ किल्लाभाग मिरज वर्ग -३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे मुलीचा विवाह झाला असुन सदर विवाहाची नोंद महानगरपालिका मिरज येथे होवुन विवाह नोंदीचे सर्टिफिकेट मिळणेकरीता तक्रारदार यांनी महानगरपालिका मिरज कार्यालयातील विवाह नोंदीणी विभागात अर्ज दिला होता. तक्रारदार यांचे मुलीचे लग्नाची नोंद होवुन विवाह नोंदीचे सर्टिफिकेट देण्याकरीता सां.मि.कुपवाड महानगरपालिका मिरज येथील विवाह नोंदणी विभागातील राजमाने यांनी तक्रारदार यांचेकडे शासकीय फी व्यतीरीक्त जादा रक्कम १०००/-रुपये मागीतले असलेबाबत तक्रारदार यांनी दि. ०५.०५.२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि. ०६.०५.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये श्री. अजित धनपाल राजमाने, कनिष्ठ लिपिक, सामान्य प्रशासन विभाग, सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली कार्यालय मिरज यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झालेने दि. ०६.०५.२०१९ रोजी मिरज महानगरपालिकेचे दुस-या मजल्यावरती सापळा लावला असता श्री. अजित धनपाल राजमाने,यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपयांची लाचेची मागणी करुन १०००/-रुपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन श्री. अजित धनपाल राजमाने, कनिष्ठ लिपिक, सामान्य प्रशासन विभाग, सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली कार्यालय मिरज यांचे विरुध्द मिरज शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी** संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- **पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६**
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net**
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५
व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१

(राजेंद्र साळुंखे)
पोलीस उप-अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली